**नियमीत दिवाणी मुकदमा क्र. २१०/२०२४ मधील नि. क्र.५४ खालील आदेश**

(सुनिता भडंगे वि. सिताराम भडंगे व इतर)

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाव्याकामी खरेदीदार यांना पक्षकार म्हणून सामील करुन घ्यावे यासाठी दाखल केला आहे.

०२. वादीचे अर्जातील कथन की, वादीने सदरचा दावा वाटपाचा पृथक कब्जाचा व कायम मनाईचा असा दाखल केला आहे. सदर दाव्याकामी तुर्तातुर्त मनाई अर्ज देखील वादींनी दिला आहे. त्यावर दि.०८.०५.२०२४ रोजी कारणे दाखवा नोटीसचा आदेश झाला आहे. दाव्याचे समन्स व तुर्तातुर्त मनाई अर्जाची नोटीस प्रतिवादी क्र. १,३,४ व ५ यांना दि. ०९.०५.२०२४ रोजी झाली आहे व प्रतिवादी क्र.२ यांना दि. २२.०५.२०२४ रोजी नोटीसीची व समन्सची बजावणी झाली आहे. सदर प्रतिवादी यांनी दाव्याकामी कैफियत व म्हणणे दिले नाही म्हणून वादींनी मनाईचा अर्ज दि.२८.०५.२०२४ रोजी दिला असता त्यावर न्यायालयाने पुढील तारखेपर्यंत दावा मिळकतीची तबदील करणेस मनाई दिली. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी तुर्तातुर्त मनाई आदेश अस्तित्वात असताना दावा मिळकत अ.क्र.१ पैकी १ हे – ७६.२५ आर जमिनीचे कथित खरेदीपत्र हे दि. १३.०६.२०२४ रोजी रजि.द.क्र. ४१९७ ने राजेंद्र बबन देशमुख, रा. बानुरगड, ता. खानापूर, जि. सांगली

या इसमाचे नावाने दस्त केला. सदर इसमाने केलेले कथित खरेदीपत्र हे दावा मिळकतीवर मनाई असताना व स्ट्रेंजर परचेसर लाभात केले आहे.

०३. सदर इसमाचे कथित खरेदीपत्र हे लिस पेंडन्सीचे तत्वाने बाधीत होते. त्यांनी वाटपाचा दावा केल्याशिवाय त्यांना कसलेही हक्क प्राप्त होत नाहीत. त्यामुळे भविष्यात वादीचे हिस्सेचे अंमलबजावणीवेळी त्यांची हरकत उपस्थित होऊ शकते. यासाठी सदर इसमास प्रतिवादी क्र. ६ म्हणून दाव्याकामी आवश्यक पक्षकार करणेची विनंती केली आहे.

०४. सदर अर्जास वादी यांनी म्हणणे दिले की, सदरच्या अर्जातील संपूर्ण मजकूर हा कायदेशीर नाही. सदर अर्जात नमूद प्रमाणे राजेंद्र बबन देशमुख यांना वादी यांनी नि.क्र.३८ मध्ये दुरुस्ती अर्जाने प्रतिवादी म्हणून पक्षकार समाविष्ट करणेची मागणी केली असून सदर अर्जावर न्यायालयाने आदेश पारित केलेला आहे. त्यामुळे पुन्हा अशा प्रकारचा अर्ज कायदयाने चालू शकत नाही. सदर अर्जातील आशय व विषय हा नि.क्र.३८ मधील आशयाशी सुसंगत असून सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सदर अर्ज दाखल करतेवेळी वादी यांना कायदेशीर तरतूद विचारात न घेता खोटा व चुकीच्या मजकूराचा अर्ज दिला आहे. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी विनंती केली आहे.

**०५.** वादी तर्फे अर्ज वाचला. प्रतिवादीचें म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द वाटपाचा व मनाईचा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये वादीने तुर्तातुर्त ताकीद अर्ज देऊन प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी दावा मिळकतीची विक्री अगर तबदिली करु नये, अशी विनंती केली आहे.

**०६.** सदर आदेशानंतर दावा मिळकत ही तबदिल झाली असल्याचे कागदपत्र वादींनी नि.क्र.४२ कडे दाखल केले आहे. यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी दि.१३.०६.२०२४ रोजी दावा मिळकत गट नं. ६९ याचे तबदिलीबाबत व्यवहार केलेले आहे. त्यामुळे खरेदीदार यांना पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी दाव्याकामी पक्षकार करणे आवश्यक असल्याने नि.क्र.३८ कडील आदेशाप्रमाणे खरेदीदार यांना पक्षकार म्हणून सामिल करुन त्या अनुषंगाने आवश्यक असणारी दुरुस्ती करण्यास परवानगी दिलेली आहे. वादीच्या अर्जातील कथनाप्रमाणे सदर खरेदीदार यांना प्रतिवादी क्र.६ म्हणून दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. वास्तविक दावा वाटपाचा असल्याने पक्षकार यांना हुकूनाम्यावेळी त्यांचे हिश्याप्रमाणे कब्जा देताना गुंतागुंत होऊ नये याकरिता सदर खरेदीदार यांना प्रतिवादी क्र.६ म्हणून दाव्यात सामी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीचा अर्ज

मंजूर करणे आवश्यक आहे. नि.क्र.३८ वरील आदेशाप्रमाणे देखील खरेदीदार हे आवश्यक पक्षकार असल्याने त्यांना प्रतिवादी क्र.६ म्हणून दाव्यात समाविष्ट न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वादीचा (नि. ५४) अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. खरेदीदार राजेंद्र बबन देशमुख यांना प्रतिवादी क्र.६ म्हणून दाव्यात समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येते.

३. वरील आदेशाप्रमाणे सदरची दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत १४ दिवसाचे आत न्यायालयात दाखल करावी.

KANCHAN BABASAHEB SONAWANE
Digitally signed by KANCHAN BABASAHEB SONAWANE
Date: 2025.04.19 11:25:41 +0530

( के. बी.सोनवणे)

दि. ०७/०४/२०२५.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.